**ePaper** भारतीयांसाठी आनंदाची बातमी, अर्थव्यवस्था जोमात; GDP 7.6 टक्क्यांनी वाढला



| वर्ष - 7 | अंक - 203 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 1 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत


- आफ्रिका दौऱ्यासाठी इंडियाची घोषणा
- उर्फीने लावली आग
- तेलंगणात काँग्रेस बाजी मारणार?
- शरद पवार पंतप्रधान का झाले नाहीत?


### उपमुख्यमंत्री अजित पवार गटाचे

# ‘मिशन मावळ’!

## » आमदार सुनिल शेळकेंचा दावा, कर्जत मध्ये मेळावा

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उपमुख्यमंत्री अजित पवार गटाने आता मावळ लोकसभेवर उघड दावा करायला सुरूवात केली आहे. आमदार सुनिल शेळके यांनी माध्यमांशी बोलताना मित्र पक्षाची राजकीय भीडभाड न ठेवता आपली स्पष्ट भूमिका ठेवत लोकसभा मतदारसंघावर दावा केला. तर मावळ लोकसभा मतदारसंघांतर्गत येणाऱ्या रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे राष्ट्रवादीने दोन दिवसीय कार्यकर्ता शिबिर मेळावा आयोजित करून आपली ताकद दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे आगामी काळात राष्ट्रवादी या मतदारसंघावर आपला हक्क सांगण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.**

त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांच्यासमोर राजकीय पेच निर्माण होणार आहे. राष्ट्रवादीच्या फुटीनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार गटाचा पहिलाच दोन दिवसीय वैचारिक मंथन मेळावा पार पडत आहे. यामध्ये पक्षात पडलेल्या फुटीपासून ते पक्षाचा प्रवास या विषयावर वैचारिक घुसळण केली जाणार आहे. हा मेळावा रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे होत असल्याने याला राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. कर्जत विधानसभा मतदारसंघ हा मावळ लोकसभेत समाविष्ठ आहे. या मतदारसंघात राष्ट्रवादी आणि शिवसेना असा संघर्ष सातत्याने मतदारांनी पाहिला आहे.



महाईन्यूज

तीन विधानसभा मतदारसंघात ताकद तरीही;

# उमेदवारीची शक्यता धुसर?

» मावळ लोकसभा मतदार संघातील स्थिती : जागावाटपावरून खडजंगी होणार?

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

महायुतीमध्ये सहभागी झाल्यानंतर लोकसभा आणि विधानसभा निवडणूकीत जागा वाटपांचा तिढा सूटणार कसा? असा प्रश्न उपस्थित होत आहे. विशेषत: मावळ लोकसभेत अधिक तिढा निर्माण होण्याची शक्यता आहे. सहा मतदारसंघापैकी तीन विधानसभा मतदारसंघात उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मोठी ताकद आहे. मात्र, विद्यमान खासदार असल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे समर्थक खासदार श्रीरंग बारणे यांना हा मतदारसंघ सोडण्याची वेळ उपमुख्यमंत्री पवार यांच्या राष्ट्रवादीवर येणार आहे. पवार समर्थक हा मतदारसंघ मोकळ्या मनाने सोडणार की जागा वाटपावरून खडाजंगी होणार? हे पहावे लागणार आहे.

मावळ लोकसभा मतदारसंघाची जागा राष्ट्रवादीसाठी सोडली जाते. विरोधात शिवसेनेचा उमेदवार असतो.

वाटपामध्ये तिढा निर्माण होणार हे नक्की आहे. मावळ लोकसभेचे उदाहरण घेतल्यास या मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसची विशेषत उपमुख्यमंत्री अजित

तसेच रायगडमधील पनवेल, कर्जत, उरण हे तीन विधानसभा मतदारसंघ आहेत. पिंपरी, मावळ विधानसभेच्या

दिले आहे. तर रायगड जिल्हा हा तटकरेंचा बालेकिल्ला आहे. तटकरेही उपमुख्यमंत्री अजित पवारांसोबत आहेत.

ग्राऊंड रिपोर्ट | शिवसेना

महाविकास आघाडीची सावध भूमिका...

» महाविकास आघाडीतील उद्धव ठाकरे यांची शिवसेना, खासदार शरद पवार यांची राष्ट्रवादी आणि काँग्रेस या पक्षांच्या नेत्यांकडून सावध भूमिका घेतली असल्याचे चित्र आहे. मावळ लोकसभेत ठाकरे यांच्या शिवसेनेची मोठी ताकद आहे. त्यांच्याकडून सातत्याने लोकसभेतील पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली जात आहे. आढावा घेतला जात आहे. मात्र उमेदवार कोण असणार या बाबत त्यांनी कमालीची गुप्तता पाळल्याचे चित्र आहे. तर उर्वरीत मित्र पक्षाने देखील या मतदारसंघावर आपला न दाखवून पक्षीय आघाडी सांभाळली आहे.

या लोकसभा मतदारसंघात शिवसेनेला मानणारा मोठा वर्ग आहे. मात्र पक्ष विखुरला गेल्याने त्याचा खासदार बारणे यांना फटका बसेल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मानणारा वर्ग या भागात कमी आहे. मात्र विद्यमान खासदार हे सूत्र लावून ही जागा मुख्यमंत्री शिंदे आपल्या पारड्यात पाडून घेणार हे नक्की आहे. उमेदवारीचे शिवधनुष्य खा. बारणे यांच्याकडे सोपविले जाईल, अशी चर्चा आहे. खासदार बारणे यांना सध्या आव्हानांचा डोंगर आहे. या उलट उपमुख्यमंत्री पवार यांच्या गटाला तीनही पक्षाची ताकद मिळाल्यास निवडणूक सोपी जाण्याची शक्यता आहे. तरीही ही जागा पवारांच्या वाट्याला न येणे हे शल्य त्यांचे समर्थक पेलवणार का, हे पहावे लागणार आहे.





उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मानणारा वर्ग या मतदारसंघात मोठा आहे. त्या पार्श्वभूमीवर आगामी काळात आपली ताकद दाखविण्यासाठी जाणीवपुर्वक ही जागा मेळाव्यासाठी निवडल्याची राजकीय वस्तूस्थिती आहे. या मेळाव्यामुळे रायगड जिल्ह्यातील

### ‘महाईन्यूज’च्या वृत्ताची चर्चा...

»‘महाईन्यूज’ने दि. २५ नोव्हेंबर रोजी मावळ लोकसभेवर सविस्तर विश्लेषणात्मक बातमी दिली होती. “तीन मतदारसंघात ताकद तरीही उमेदवारीची शक्यता धुसर” या मथळ्याखाली वस्तूस्थिती मांडण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी आमदार सुनील शेळके यांनी पत्रकार परिषद घेतली आणि खासदार श्रीरंग बारणे यांच्यावर निशाना साधला होता. ‘महाईन्यूज’च्या या वृत्ताची राजकीय वर्तुळात चर्चा रंगली. त्याचा संदर्भ घेत उपमुख्यमंत्री अजित पवार गटाकडून मावळ लोकसभेवर दावा केला जात आहे.

तीन विधानसभा मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांमध्ये ऊर्जा भरण्याचे काम पक्षाने केले आहे. दुसरीकडे घाटावरील म्हणजेच पिंपरी, मावळ आणि चिंचवड विधानसभेवर आमदार सुनिल शेळके यांनी विशेष लक्ष केंद्रीत केले असल्याचे चित्र आहे. चिंचवड विधानसभेच्या पोटनिवडणूकीची विशेष जबाबदारी आमदार शेळके यांच्यावर सोपवली होती. मावळ विधानसभा शेळके यांचा बालेकिल्ला आहे. त्यामुळे या तीनही मतदारसंघात राष्ट्रवादीला ते मजबूत करण्याचे आणि राजकीय गणिते जुळविण्याचे काम करतील. त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी नुकतेच राष्ट्रवादीला हा मतदारसंघ मिळावा यासाठी वरिष्ठांना साकडे घालणार असल्याचे उघड वक्तव्य केले आहे. सध्याची राजकीय परिस्थिती पाहता आमदार शेळके यांचे वक्तव्य आगामी काळात मावळ लोकसभेच्या जागेबाबत सूचक विधान मानले जात आहे.

---

# शहरात विकसित भारत संकल्प यात्रा

## » प्रशासनचा पुढाकार : केंद्राच्या योजना लाभार्थ्यांना पोहोचवणार

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारत सरकारच्या महत्वाकांशी योजनांचे लाभ लक्षित लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी केंद्र शासनाच्या विकसित भारत संकल्प यात्रेचा शुभारंभ पिंपरी चिंचवड शहरात प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह,चिंचवड येथे नुकताच २८ नोव्हेंबर रोजी करण्यात आला होता. आज सदर यात्रेचे वाहन आकुर्डी येथे आले असता स्थानिक नागरिकांनी भेट देऊन शासनांच्या विविध योजनांची माहिती घेतली.**

या कार्यक्रमास आमदार उमा खापरे, माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके,अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.लक्ष्मण गोफणे, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अंजली ढोणे, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. बाळासाहेब होडगर, तसेच आकुर्डी, दत्तवाडी परिसरातील नागरिक उपस्थित होते. यावेळी आमदार उमा खापरे यांनी विकसित भारत संकल्प यात्रेच्या विविध कक्षांनाही भेट देऊन



तेथील योजनांची माहिती घेतली.

आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या सुचनेनुसार आणि अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजकुमार खोराटे, उल्हास जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवड शहरातील ६४ ठिकाणी हे वाहन भेट देणार असून प्रत्येक वॉर्डामध्ये २ ठिकाणी या वाहनासह नागरिकांना मार्गदर्शन करणारे विविध कक्ष केंद्र शासनाच्या विविध योजनांचे लाभ देण्यासाठी

### विविध योजनांचा समावेश...

»महिला बालकल्याण मार्गदर्शन कक्षाद्वारे विविध योजनांतर्गत इ. ८ वी ते इ. १० वी मधील विद्यार्थीनींना सायकल घेणेकामी अर्थसहाय्य, सावित्रीबाई फुले पुरस्कार, निर्भया अस्तित्व पुर्नवसन योजना (पिडीत व अत्याचारीत मुलीला / महिलेला तिच्या पुर्नवसनासाठी अर्थसहाय्य), बेटी बचाओ बेटी पढाओ योजना - पहिल्या मुलीवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणाऱ्या महिलेस अर्थसहाय्य, महिलांसाठी चार चाकी वाहन प्रशिक्षण यासह विविध योजनांचा समावेश आहे.

उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या योजनांमध्ये आधार केंद्र, आत्मनिर्भर स्वनिधी योजना,आयुष्मान कार्ड,महिला व बाल- कल्याण योजना,मागासवर्गीय कल्याणकारी योजना,दिव्यांग कल्याणकारी योजना तसेच इतर कल्याणकारी योजनांचा समावेश आहे.

# पुण्यातील मजूर गेले कुठे?

## » प्रत्यक्ष कामावर केवळ 851 मजूर असल्याचे समोर

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हाताला काम नसल्याची ओरड एकीकडे होत असताना पुणे जिल्ह्यात रोजगार हमी योजनेंतर्गत तब्बल ९७ हजार मजुरांनी नोंदणी केली आहे. मात्र, प्रत्यक्ष कामावर केवळ ८५१ मजूर असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील मजूर गेले कुठे?, या प्रश्नाने जिल्हा प्रशासन बुचकाळ्यात पडले आहे.**



जानेवारी ते जुलै या कालावधीत पाण्याच्या अभावामुळे शेतीची कामे नसल्याने गावागावांत रोजगारीचा प्रश्न निर्माण होतो. या स्थितीवर मात करण्यासाठी शासनाच्या वतीने रोहयो अंतर्गत सार्वजनिक कामे करून गावात रोजगार निर्माण करण्यात येतात. जूनमध्ये पावसाला सुरुवात झाल्यानंतर शेतीची काम सुरू होतात. यामुळे रोहयोच्या कामावरील मजूर कमी होतात. मात्र, यंदा विलंबाने दाखल झालेल्या मोसमी पावसाने सरासरीदेखील गाठली नाही. परिणामी राज्यभरात दुष्काळी स्थिती ओढवली आहे. त्यामुळे कामाच्या शोधासाठी राज्याच्या विविध भागांतून नागरिकांचे पुण्यात स्थलांतर होण्याची शक्यता गृहित धरून जिल्हा प्रशासनाने रोहयो अंतर्गत कामे उपलब्ध करून देण्यास सुरुवात केली आहे. एकीकडे कामे उपलब्ध असताना प्रत्यक्ष कामावर मजूर नसल्याचे जिल्हा प्रशासनाच्या पाहणीत लक्षात आले आहे. 'सध्या रोहयो अंतर्गत पुणे जिल्ह्यात २१४ कामे उपलब्ध असून, त्यावर ८५१ मजूर कार्यरत आहेत. ९७ हजार ३७५ मजुरांची जॉब कार्ड सक्रिय आहेत. उन्हाळ्यात मजुरांची संख्या वाढण्याची शक्यता आहे' असे रोहयोच्या उपजिल्हाधिकारी दीप्ती सूर्यवंशी-पाटील यांनी म्हटले आहे. रोजगारासाठी रोहयो अंतर्गत रस्ता बनवणे, पाणंद रस्ते तयार करणे, माती नालाबांध बनवणे, वनराई बंधारा, सामूहिक शेततळी, गाव तलाव, साठवण तलाव, जैविक बंधारा, खारजमीन विकास बंधारा, पाझर तलावातील गाळ काढणे, रोपवाटिका, कालव्याची दुरुस्ती, नूतनीकरण व अस्तरीकरण, सिंचन विहीर अशी सार्वजनिक कामे केली जातात. या गावांमध्ये रोहयोमार्फत जलसंधारणाची कामे करण्यात येतात. या कामांमुळे भविष्यात गावातील दुष्काळीस्थिती दूर होण्यास मदत होते. रोहयोतून यापूर्वी २७२ रुपये मजुरी मिळत असे, ती आता ४४७ रुपये करण्यात आली आहे. त्यामुळे कामाच्या शोधासाठी राज्याच्या विविध भागांतून नागरिकांचे पुण्यात स्थलांतर होण्याची शक्यता गृहित धरून जिल्हा प्रशासनाने रोहयो अंतर्गत कामे उपलब्ध करून देण्यास सुरुवात केली आहे.

### गावागावांत रोजगारीचा प्रश्न निर्माण

» मात्र, प्रत्यक्ष कामावर केवळ ८५१ मजूर असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील मजूर गेले कुठे?, या प्रश्नाने जिल्हा प्रशासन बुचकाळ्यात पडले आहे. जानेवारी ते जुलै या कालावधीत पाण्याच्या अभावामुळे शेतीची कामे नसल्याने गावागावांत रोजगारीचा प्रश्न निर्माण होतो. या स्थितीवर मात करण्यासाठी शासनाच्या वतीने रोहयो अंतर्गत सार्वजनिक कामे करून गावात रोजगार निर्माण करण्यात येतात. जूनमध्ये पावसाला सुरुवात झाल्यानंतर शेतीची काम सुरू होतात. यामुळे रोहयोच्या कामावरील मजूर कमी होतात. मात्र, यंदा विलंबाने दाखल झालेल्या मोसमी पावसाने सरासरीदेखील गाठली नाही.

# पीएमआरडीए – महापालिका आमनेसामने

## » धंगेकरांचे पुणे पोलीस आयुक्त कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हिंजवडी ते शिवाजीनगर या मार्गावर पुणेरी मेट्रोचे काम सुरू आहे. आता या कामात गणेशखिंड रस्त्यावरील दोन मेट्रो स्थानकांवरून तिढा निर्माण झाला आहे. रिझर्व्ह बँक कार्यालय आणि वेधशाळेसमोरील शिवाजीनगर या दोन स्थानकांचे प्रवेशद्वार आणि बाहेर पडण्याचे जिने कुठे असावेत, असा वाद निर्माण झाला आहे. यामुळे महापालिका आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आमनेसामने आले आहेत.**



गणेशखिंड रस्त्यावर रिझर्व्ह बँक कार्यालय आणि शिवाजीनगर ही पुणेरी मेट्रोची दोन स्थानके नियोजित आहेत. या स्थानकांचे काम सध्या सुरू आहे. पुणेरी मेट्रोचा हा प्रकल्प पीएमआरडीएकडून सार्वजनिक खासगी भागीदारीतून टाटा समूहासोबत सुरू आहे. या मेट्रो मार्गाचा प्रकल्प विकास आराखडा गणेशखिंड रस्त्याची रुंदी ३६ मीटर गृहित धरून करण्यात आला. नंतर या रस्त्यावर दुमजली उड्डाणपूल बांधण्याचे नियोजन झाले. त्यात रस्ता अरुंद होत असल्याने त्याची रुंदी ३६ वरून ४५ मीटर करण्याचा निर्णय झाला. त्यामुळे या संपूर्ण रस्त्याची रुंदी ४५ मीटर करण्याचे पाऊल महापालिकेने उचलले. सुमारे दोन वर्षांनंतर भूसंपादन पूर्ण होऊन आता हे रस्त्याचे रुंदीकरण पूर्ण होत आले आहे.

मेट्रोच्या या दोन्ही स्थानकांचे प्रवेश करण्याचे आणि बाहेर पडण्याचे जिने ४५ मीटरच्या रस्त्याच्या आतमध्ये येत आहेत. यावर महापालिकेने पीएमआरडीएला पत्र पाठवून हे जिने ४५ मीटर रस्ता रिकामा ठेवून बाहेर घेण्यास सांगितले. मात्र, जिने बाहेर घ्यावयाचे झाल्यास आणखी भूसंपादन करावे लागणार आहे. एकंदरीत भूसंपादची प्रक्रिया वेळखाऊ असल्याने आता स्थानकांचा उभारणीचा तिढा निर्माण झाला आहे. त्यामुळे या स्थानकांच्या जिन्याचे काम सध्या थांबविण्यात आले आहे. यावर मार्ग काढण्यासाठी महापालिका आयुक्त विक्रम कुमार आणि पीएमआरडीए आयुक्त राहुल महिवाल हे लवकरच बैठक घेणार आहेत, अशी माहिती सूत्रांनी दिली. महापालिकेने सांगितल्याप्रमाणे ४५ मीटर रस्त्याबाहेर मेट्रो स्थानकांचे जिने घ्यावयाचे झाल्यास रिझर्व्ह बँक, आकाशवाणी, वेधशाळा यासह इतर संस्थांची आणखी जागा घ्यावी लागेल. भूसंपादनाची प्रक्रिया वेळखाऊ असल्याने यामुळे प्रकल्पाला एक ते दीड वर्षाचा विलंब लागू शकतो.

> “ रिझर्व्ह बँक आणि वेधशाळेसमोरील मेट्रो स्थानकांचे जिने ४५ मीटर रस्त्याच्या बाहेर असावेत, असे महापालिकेचे म्हणणे आहे. यासाठी अतिरिक्त भूसंपादन करावे लागेल. यावर पीएमआरडीए आयुक्त आणि महापालिका आयुक्त यांच्यात लवकरच बैठक होऊन निर्णय घेतला जाईल.
>
> – **रिनाज पठाण,** मुख्य अभियंता, पीएमआरडीए

> “ गणेश खिंड रस्त्याचा पुढील ५० वर्षांचा विचार करून वाहतूक नियोजन आवश्यक आहे. त्यामुळे मेट्रो स्थानकांचे जिने ४५ मीटर रुंदीच्या रस्त्याच्या आतमध्ये आल्यास तो अरुंद होईल. त्यामुळे आणखी भूसंपादन करूनही हे जिने बाहेरील बाजूस घेता येतील.
>
> – **विकास ढाकणे,** अतिरिक्त आयुक्त, महापालिका

# गणेश बँकेच्या प्रगतीसाठी कटिबद्ध!

## शंकर जगताप यांची भावना : संचालक मंडळाकडून अध्यक्षपदी बिनविरोध निवड



। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**श्री गणेश सहकारी बँकेच्या स्थापनेपासून तळागाळातील घटकांसाठी ही बँक महत्वपूर्ण ठरली आहे. लोकसेवेचा वसा घेतलेल्या या बँकेची स्थापना लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या माध्यमातून करण्यात आली होती. ग्राहकांना वेगवान सेवा देण्यासाठी लक्ष्मणभाऊ हे नेहमीच आग्रही होते. त्यांचीच प्रेरणा घेवून बँकेला पुढे घेवून जाण्यासाठी आम्ही कटिबद्ध असणार असल्याची भावना श्री गणेश सहकारी बँकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केली.**

आज (दि. ३०) श्री गणेश बँकेच्या पिंपळे गुरव येथील मध्यवर्ती कार्यालयात निवडून आलेल्या संचालकांची बैठक झाली. या बैठकीत सर्वानुमते शंकर जगताप यांची अध्यक्षपदी, तर संतोष देवकर यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. या निवडीनंतर शंकर जगताप बोलत होते. आगामी काळात सहकार क्षेत्र हे देशाच्या विकासात महत्वाची भूमिका बजावणार आहे. त्यामुळेच लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप, नानासाहेब शितोळे, राजेंद्र राजापूरे, दत्तात्रय उर्फ रावसाहेब चौगुले आणि उद्धव पटेल यांच्या पुढाकाराने सन १९९८ साली बँकेची स्थापना केली होती. लोकनेते लक्ष्मणभाऊ यांच्यावर असलेल्या विश्वासामुळे तसेच बँकेच्या माध्यमातून मिळणाऱ्या तत्पर सेवा, आकर्षक कर्ज योजना, ठेव योजना यामुळे बँकेकडे ग्राहकांचा ओघ सातत्याने वाढत आहे. काही दिवसांपूर्वी बँकेची पंचवार्षिक (सन २०२३-२०२८) निवडणूक घेतली होती. या निवडणुकीत १७ संचालक बिनविरोध निवडून आले होते. याच संचालक मंडळातून अध्यक्ष, उपाध्यक्ष यांची निवड करण्यात आली आहे. या निवडणुकीत निवडणूक अधिकारी म्हणून नागनाथ केंजेरी, सहायक शशिकांत शिंगारे, गजेंद्र सवईकर, यांनी कामकाज पाहिले. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय बाईत, शाखा व्यवस्थापक ईश्वर काटे व अन्य कर्मचारी वर्ग उपस्थित होता. लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांनी पुढाकार घेताना बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याच्या प्रथेला सुरुवात केली होती. मात्र, आमदार जगताप हयात नसताना त्यांचे बंधू शंकर जगताप यांनीदेखील हीच परंपरा कायम राखताना ही पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध केली होती.

> लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांनी सहकाराच्या दृष्टीकोनातून दाखविलेल्या विकासाच्या महामार्गावर श्री गणेश सहकारी बँक आपली नियमित प्रगती करत आहे. बँकेवर ज्या पद्धतीने सभासदांनी व खातेदारांनी विश्वास ठेवला, तोच विश्वास आणि बँकेची नियमित प्रगती साधण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. खातेदारांनी बँकेवर दाखविलेला विश्वास हीच आमच्यासाठी आमच्या कामाची पावती आहे.
>
> **- शंकर जगताप,**
> **अध्यक्ष, श्री गणेश सहकारी बँक मर्या., पिंपळे गुरव..**

### नवनिर्वाचित कार्यकारिणी पुढीलप्रमाणे...

अध्यक्ष : शंकर पांडुरंग जगताप, उपाध्यक्ष : संतोष सखाराम देवकर, कार्यकारिणी सदस्य : राजेंद्र शंकर राजापूरे, दत्तात्रय गोविंद चौगुले, शशिकांत गणपत कदम, संजय गणपत जगताप, उद्धव मुरार पटेल, सुरेश शंकर तावरे, शिवलिंग बसवंत किनगे, अंकुश रामचंद्र जवळकर, मधुकर सोपान रणपिसे, सुरेश तात्याबा शिंदे, शहाजी भगवान पाटील, प्रमोद नाना ठाकर, अभय केशव नरडवेकर. संचालिका : राजश्री बिभिषण जाधव, शैला जनार्धन जगताप.

# मावळमधून महायुतीचा उमेदवार मीच!

## खासदार श्रीरंग बारणे : आगामी निवडणुकीसाठी थोपाटले दंड




। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी लोकसभा निवडणुकीत मावळमधून महायुतीकडून माझ्या उमेदवारी बाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतच्या झालेल्या बैठकीत निर्णय झाला आहे. त्यामुळे 2024 साली महायुतीचा उमेदवार मीच असून विजयी देखील मीच होणार हा माझा फाजील आत्मविश्वास नाही तर ठाम विश्वास असल्याचे खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितले. तसेच माझ्या कामाचा लेखाजोखा जनतेला देण्यासाठी बांधील आहे, वैयक्तिक कोणाला नाही, असेही ते म्हणाले.**

महाराष्ट्रातील 48 लोकसभा जागांमध्ये माझी विजयाची मते ही निर्णायक असतील असा ठाम विश्वास व्यक्त करत खासदार बारणे म्हणाले, मी जनतेमध्ये राहून काम करणारा लोकप्रतिनिधी आहे. मागील 27 वर्ष मी लोकप्रतिनिधी म्हणून काम करत आहे. या काळात माझ्या डोक्यात किंवा अंगात कोणतीही हवा मी शिरू दिलेली नाही. जनतेची कामे करण्याला प्राधान्य देतो, नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी मी सतत पाठपुरावा करत असतो. कामामुळे मतदार माझ्यासोबत आहे.

येणाऱ्या लोकसभा निवडणुकीला सामोरे जाताना मी काय काम केले हे मी जनतेला सांगेल, कोणीतरी राजकीय द्वेषातून व सुडापोटी मला काय काम केले असे विचारणा करत असेल तर त्यांना उत्तर द्यायला मी बांधील नाही. माझी बांधिलकी माझ्या मतदारांशी आहे. आमदार सुनील शेळके यांचे व माझे राजकीय किंवा वैयक्तिक कसलेच मतभेद नाही. पण त्यांनी माझ्यावर आरोप का केले, कोणी त्यांना बोलायला लावतंय का? हे बघावं लागेल, समक्ष भेटल्यावर मी त्यांना याबाबत विचारणा असल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले. तळेगावदाभाडे नगरपरिषदेच्या मुख्याधिकारीपदी एन.के.पाटील यांच्याकरिता दिवंगत किशोर आवरे यांनी शिफारस केली होती म्हणून मी पत्र दिले. हे मी आमदार शेळके यांना देखील सांगितले होते व त्यांची बदली करा म्हणून शेळके यांनी माझ्याकडे मागणी केल्यानंतर मी मुख्यमंत्री यांच्या कानावर विषय घालत बदलीसाठी पत्र देखील दिले आहे. ते पत्र आमदार शेळके यांनी देखील पाठविले आहे. एखाद्या मृत व्यक्तीच्या विषयी मनात आकस ठेवणे योग्य नाही असे देखील बारणे म्हणाले.

### मी राष्ट्रवादीचा 2 लाखांनी पराभव केला...

**भाजपचे देशातील नेते अमित शहा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आम्हाला जे शिवसेनेचे खासदार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सोबत आहे. त्या जागा त्यांनाच देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे कोण काय बोलते, याला महत्व नाही. भाजपाच्या या दोन नेत्यांशिवाय निर्णय घेणारा अजून कोणी आहे असे मला वाटत नाही. राष्ट्रवादीला त्यांची ताकद वाढली आहे असे वाटत असेल तर त्यांनी खुशाल मागणी करावी, मागील काळात मी राष्ट्रवादीचा दोन लाख मतांनी पराभव केला आहे, याकडेही बारणे यांनी लक्ष वेधले.**




**ऑस्ट्रेलियाकडून विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत पराभूत झाल्यामुळे निर्माण झालेल्या राष्ट्रीय दुःखावर उत्तराखंडातील बोगद्यात १७ दिवस अडकलेल्या कामगारांची यशस्वी सुटका हा उतारा होता. या सुटकेत महत्त्वाची भूमिका बजावणारे, अथक प्रयत्न करणारे आणि यशाचा मार्ग दाखवणारे तंत्रज्ञ अर्नाल्ड डिक्स हे ऑस्ट्रेलियाचेच असावेत हा विचित्र योगायोग.**

# संकटामागचे सत्य!



या डिक्स यांच्या जोडीला विविध सरकारी उपक्रमांस आणि उपकरणांस मुन्ना कुरेशी, फिरोज, रशीद, इर्शाद, नसीम, नसीर, अंकुर, जतीन, सौरभ, वकील, हसन, देवेंदर अशा झारखंड, बिहार आदी राज्यांतील गरीब, आदिवासी उपेक्षित कामगारांची साथ निर्णायक ठरली आणि जवळपास ४०० तास अंधारबोगद्यात खितपत पडलेल्या कामगारांस अखेर मोकळा श्वास घेता आला. या कामगार बचाव मोहिमेत सहभागी असलेले वरील सर्व आणि अन्य नि:संशय अभिनंदनास पात्र ठरतात. गेले दोन-अडीच आठवडे समस्त भारतीयांचा दिवस एकाच प्रश्नाने उगवत होता आणि त्या प्रश्नाच्या उत्तराच्या प्रतीक्षेत संपत होता. ही प्रतीक्षा आता संपली. आपल्या राष्ट्रीय सवयीप्रमाणे आता या सुटका मोहिमेचे गोडवे इतके गायले जातील की त्यात एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न पूर्ण दुर्लक्षित होईल. 'मुळात ही अशी अडकून राहण्याची वेळ या कामगारांवर आलीच कशी, का आणि कोणामुळे', हा तो प्रश्न. कामगारांच्या यशस्वी सुटकेनंतर आता तो विचारणे हे कर्तव्य ठरते. कारण असे प्रश्न विचारणे हाच आपल्या मानवी जीवांबद्दल असलेल्या राष्ट्रीय हेळसांड सवयीवरील उपाय असू शकतो. उत्तरकाशीतील सिलक्यारा बोगद्यात अडकलेल्या या कामगारांच्या सुटकेसाठी शेवटी 'रॅट होल मायनिंग' या अवैध खनिकर्म पद्धतीचा अवलंब करावा लागला. विविध बनावटींची छिद्रक यंत्रे कुचकामी ठरली तेव्हा हाताने खणून कोळसा उचकटणाऱ्यांना पाचारण करावे लागले. हा तोडगा यशस्वी ठरला हे ठीक. पण त्याचा अवलंब करावा लागणे हे, अशा प्रकल्पांच्या आणि संभाव्य दुर्घटनांच्या हाताळणीतील आपल्या सिद्धतेबाबत प्रश्न निर्माण करणारे ठरते. उत्तरकाशी हा जिल्हा उत्तराखंड राज्यातला. त्या राज्याचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी अडकलेल्या कामगारांच्या सुटकेबद्दल स्थानिक देवतेचे आभार मानले. श्रद्धा म्हणून हेही ठीक. कारण इतर सारे प्रयत्न सातत्याने अपयशी ठरत असताना बहुधा या कृपाप्रसादाची त्यांना इतके दिवस प्रतीक्षा असावी! या परमेश्वरी ताकदीची धामी सरकारला खात्री इतकी, की दुर्घटनास्थळी खास बोलावून घेतलेले आंतरराष्ट्रीय बोगदे तंत्रज्ञान तज्ज्ञ डिक्स यांनाही पूजापाठ करावा लागला म्हणतात. तेव्हा इतके दिवस पर्वतउदरात अडकून कासावीस झालेल्या कामगारांना अखेरीस प्रकाशाचा कवडसा दाखवण्याचे श्रेय स्थानिक देवतेस आणि पोटाची खळगी भरण्यासाठी 'रॅट-होल मायनिंग'सारख्या धोकादायक परंतु अवैध उद्योगात गुंतलेल्या अनामांनाच द्यावे काय, या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी असेल, तर या संपूर्ण दुर्घटनेची तंत्रसिद्धतेच्या दृष्टिकोनातून चिकित्सा होणे गरजेचे आहे. चारधाम प्रकल्पाचा भाग असलेल्या सिलक्यारा-बारकोट या निर्माणाधीन बोगद्याचा सिलक्याराच्या बाजूकडील ६० मीटर उंचीचा भाग खचल्यामुळे कामगार अडकले. १२ नोव्हेंबर रोजी पहाटे ही घटना घडली. दरम्यानच्या काळातील निराशा, सततचे अपयश यांकडे दुर्लक्ष करून अखेरीस २८ नोव्हेंबर रोजी कामगार सुखरूप परतले. तथापि त्यांच्या स्वागतास फक्त मुख्यमंत्री धामी वा एकच केंद्रीय मंत्री असणे ही तशी आश्चर्याचीच बाब! या आनंदोत्सवात हिमालय 'पोखरण्या'च्या अशा अनेक योजनांचा, प्रकल्पांचा फेरविचार करण्याची वेळ आलेली आहे, या मुद्द्याकडे दुर्लक्ष संभवते. सिलक्यारा-बारकोट या प्रस्तावित साडेचार किलोमीटर लांबीच्या बोगद्याचे काम सुरू असताना १२ नोव्हेंबर रोजी सिलक्याराच्या बाजूकडील बोगद्याचा काही भाग खचला आणि त्यामुळे बोगद्यात आधीपासूनच गेलेले ४१ कामगार अडकले. या बोगद्याच्या बारकोटकडील बाजूच्या मधल्या भागात ४८३ मीटर लांबीच्या भागातील काम बाकी आहे. त्यामुळे साधारण दोन किलोमीटर लांबीच्या बांधकामाधीन बोगद्यामध्ये कामगार अडकून पडले. त्या भागातील विजेच्या तारांना धक्का लागला नाही. त्यामुळे कामगार असलेल्या भागात विजेचे दिवे सुरू होते. तसेच चार इंच रुंदीच्या कॉम्प्रेसर पाइपचेही नुकसान झाले नाही.

## संपादकीय »

### वाळवंटी विनोद!

***उद्या, ३० नोव्हेंबरास, वाळवंटातील दुबई येथे संयुक्त राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय पर्यावरण परिषदेस सुरुवात होणे आणि त्या पार्श्वभूमी भूमीवर आपल्याकडे गारपीट होणे याचा अर्थाअर्थी काहीही संबंध नाही.***

उद्या, ३० नोव्हेंबरास, वाळवंटातील दुबई येथे संयुक्त राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय पर्यावरण परिषदेस सुरुवात होणे आणि त्या पार्श्वभूमी भूमीवर आपल्याकडे गारपीट होणे याचा अर्थाअर्थी काहीही संबंध नाही. तसेच या परिषदेस अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन, चीनचे क्षी जिनपिंग हे अनुपस्थित राहणार आहेत आणि आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी आवर्जून हजेरी लावणार आहेत याचाही काही संबंध नाही. ग्रेट ब्रिटनचे राजे चार्ल्स, त्या देशाचे पंतप्रधान ऋषी सुनक, पोप इत्यादी मिळून हजारो जण या परिषदेस हजेरी लावणार आहेत. संयुक्त अरब अमिरातीकडे 'सीओपी २८' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या परिषदेचे यजमानपद आहे. अमिरातीचे सुलतान अल जबेर यांच्याकडे या परिषदेची सूत्रे असतील. हे जबेरभाई संयुक्त अरब अमिरातीच्या 'अॅडनॉक' या राष्ट्रीय तेल कंपनीचे प्रमुखदेखील आहेत.

**क्रिकेट विश्वचषकाचा माहोल नुकताच संपला असला तरीही भारताच्या अंतिम फेरीतील पराभवाचे कवित्व अजून सुरूच आहे! खेळ म्हटले की हारजीत आलीच हे आपण समजू शकतो, पण या विश्वचषकादरम्यान दोन षटकांमधील ब्रेकदरम्यान कपिलदेव आणि सुनील गावस्कर यांना पानमसाल्याच्या नावाखाली तंबाखू/ गुटखा यांची जाहिरात करताना बघणे हे मात्र माझ्यासारख्या क्रिकेटरसिकाला पचवणे खूपच अवघड जाते आहे.**

# हे तर लोकांच्या हानीचे लाभार्थी!



भारतातील क्रिकेटरसिकांच्या तीन-चार पिढ्यांनी सन्मानित केलेले हे क्रिकेटमधले दिग्गज आहेत! क्रिकेट म्हणजे जणू धर्मच मानणाऱ्या आपल्या देशात कपिलदेव, सुनील गावस्कर, सचिन तेंडुलकर यांच्यासारख्या लोकांना क्रिकेटचे तारे म्हणूनच पुजले जाते. सत्तरीला आलेल्या कपिलदेव यांच्याबद्दल तंदुरुस्तीची मिसाल म्हणून आजही भारतीय क्रिकेटचाहत्यांमध्ये मोठा आदर आहे. खेळताना दुखापत न होता ते शंभर कसोटी खेळले आहेत. ते घेत असलेला चौरस आहार, दूध यांचे किस्से क्रिकेटरसिक अजूनही चवीने चघळतात. '83'सारख्या सिनेमामध्ये ते दाखवले गेले आहेच. असा माणूस वयाच्या सत्तरीमध्ये तंबाखूजन्य पदार्थांची जाहिरात करत तरुणाईला त्यांचा उपभोग घेण्याचे आवाहन करतो, तेव्हा ती खटकणारीच गोष्ट असते. तीच गोष्ट सुनील गावस्कर यांची! क्रिकेटपटू म्हणून त्यांनी ऑफ स्टंपबाहेरचे चेंडू सोडताना दाखवलेल्या संयमाचे आजही उदाहरण दिले जाते. ज्या निग्रहाने ते ऑफ स्टंपबाहेरचा बॉल सोडत तो निग्रह तंबाखूजन्य पदार्थांच्या जाहिरातीमधून मिळणाऱ्या पैशाच्या मोहात पडताना मात्र ते दाखवू शकलेले नाहीत असे दिसते. तरुण क्रिकेटपटूंनी केलेल्या चुका ते कोणतीही भीडभाड न ठेवता आपल्या समालोचनामधून सांगत असतात. आपण विश्लेषण करत असताना, भाषा कठोर असली तरी वेळीच चुका दाखवून देणे हे भविष्यातील गंभीर दुष्परिणाम टाळण्यासाठी महत्त्वाचे असते असे त्यांचे म्हणणे असते आणि ते रास्तही आहे. मग हीच गोष्ट ते पानमसाल्याच्या जाहिराती करताना मात्र सोयीस्कररीत्या विसरतात! त्यांचे चाहते असलेल्या अनेक तरुण मुलांना ते व्यसनाचा अनुभव घेण्यास उद्युक्त करतात हे शोचनीय आहे. वीरेंद्र सेहवागसारख्या सत्तेपुढे 'वाका म्हटले तर रांगणाऱ्या' खेळाडूकडून किंवा ख्रिस गेलसारख्या खेळाडूंकडून ही अपेक्षा नाही, पण गरज पडली तर सत्ताधारी लोकांच्या विरोधात जाऊन महिला कुस्तीगिरांना पाठिंबा देणाऱ्या कपिलदेव आणि सुनील गावस्कर यांच्याकडून हे अपेक्षित नक्कीच नाही. आता या जाहिराती पानमसाल्याच्या आहेत, तंबाखूजन्य पदार्थांच्या नाहीत, असे एक लंगडे समर्थन त्यांचे समर्थक करू शकतात, पण ते जाहिरात करतात तो केवळ पानमसाला नसून प्रामुख्याने गुटखा आहे हे अगदी शालेय मुलांनादेखील माहीत असते. पानमसाला या नावाखाली गुटखा, पाण्याच्या बाटलीच्या नावाखाली दारू (बॅगपायपर इत्यादी) यांच्या जाहिराती करणे याला सरोगेट जाहिराती म्हटले जाते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शरद पवार पंतप्रधान का झाले नाहीत?

## » माहीत नसणारी गोष्ट प्रफुल्ल पटेलांनी केली उघड

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांचं पंतप्रधान होण्याचं स्वप्न अधुरं राहिलं हे कायमच सांगितलं जातं. शरद पवार देशाचे पंतप्रधान व्हावेत अशी इच्छा राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनीही बोलून दाखवली होती. या सगळ्या चर्चा होत असताना अजित पवार गटाचे नेते प्रफुल्ल पटेल यांनी शरद पवारांना पंतप्रधान होण्याची संधी चालून आली होती, मात्र हातात असूनही त्यांनी ती संधी घेतली नाही असं सांगितलं आहे.**

कर्जत या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेसचा मेळावा सुरु आहे. या मेळाव्यात प्रफुल पटेल यांनी हा खुलासा केला आहे. "१९७८ मध्ये शरद पवार काँग्रेसपासून वेगळी झाली होते. मात्र राजीव गांधी शरद पवार १९८६ मध्ये काँग्रेसमध्ये आले. राजीव गांधींकडे बहुमत होतं. त्यामुळेच शरद पवार काँग्रेसमध्ये परतले. ती भूमिका त्यांनी का घेतली? शरद पवार यांनी १९७८ मध्ये महाराष्ट्राचं भलं होण्यासाठी पुलोदचं सरकार स्थापन केलं होतं. त्या सरकारमध्ये हाशू अडवाणी, उत्तमराव पाटील होते हे दोघं भारतीय जनसंघाचे संस्थापक होते. महाराष्ट्राच्या भल्यासाठीच त्यांनी निर्णय घेतला होता. काँग्रेसमध्ये शरद पवार आले तेव्हा आम्ही त्यांच्यासह अधिकृत रित्या काम सुरु केलं. काँग्रेसमध्येही अनेक चढाओढी आणि स्पर्धा पाहिल्या. आम्हाला ते सगळं ठाऊक आहे असं प्रफुल पटेल यांनी म्हटलं आहे. त्यावेळी जशी परिस्थिती आली तशी वाटचाल त्यांनी केली. यशस्वी नेता तोच असतो जो वेळेचं भान ठेवून निर्णय घेतो." अजित



पवार यांनी मुख्यमंत्री व्हावे तसेच शरद पवार पंतप्रधान व्हावेत ही आमची इच्छा होती. नरसिंह राव यांना हटवण्यासाठी आम्ही पूर्णपणे प्रयत्न केले होते. परंतु त्यावेळी राव यांनी सीताराम केसरींना काँग्रेसचे अध्यक्ष करण्यात आलं. त्यानंतर एच.डी. देवेगौडा पंतप्रधान झाले. पण सीताराम केसरी यांनी देवेगौडा यांचा पाठिंबा काढून घेतला. १३५ पेक्षा जास्त खासदार शरद पवार यांच्या घरी आले. तुम्ही केसरींना हटवा अशी विनंती सर्वांनी केली. त्यावेळी देवेगौडा यांचा मला फोन आला. मी त्यांच्या घरी गेलो. तेव्हा देवेगौडा यांनी मी राजीनामा देतो, पण केसरींना हटवा. शरद पवार यांना भूमिका घ्यायला सांगा असा मला निरोप दिला", अशी माहिती प्रफुल्ल पटेल यांनी आपल्या दिली. "या सगळ्या गोष्टी घडल्यानंतर मी तातडीने शरद पवार यांना भेटलो. आपल्याला मोठी संधी आहे. तुम्ही भूमिका घ्या, अशी गळ मी शरद पवार यांना घातली. त्यावर पवार यांनी १५ मिनिटात बैठक संपवून नंतर बोलू असं म्हणत आलेली सुवर्णसंधी घालवली. काय झालं हे मला कळलं नाही. पण शरद पवार पंतप्रधान झाले नाहीत. ते पंतप्रधान झाले नाहीत याची खंत माझ्या मनात कायम आहे, असंही प्रफुल्ल पटेल म्हणाले." अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीचं कर्जत येथे अधिवेशन सुरू आहे, त्या सरकारमध्ये हाशू अडवाणी, उत्तमराव पाटील होते हे दोघं भारतीय जनसंघाचे संस्थापक होते. महाराष्ट्राच्या भल्यासाठीच त्यांनी निर्णय घेतला होता. काँग्रेसमध्ये शरद पवार आले तेव्हा आम्ही त्यांच्यासह अधिकृत रित्या काम सुरु केलं. काँग्रेसमध्येही अनेक चढाओढी आणि स्पर्धा पाहिल्या.

### पंतप्रधान व्हावेत ही आमची इच्छा

» आम्हाला ते सगळं ठाऊक आहे असं प्रफुल पटेल यांनी म्हटलं आहे. त्यावेळी जशी परिस्थिती आली तशी वाटचाल त्यांनी केली. यशस्वी नेता तोच असतो जो वेळेचं भान ठेवून निर्णय घेतो." नरसिंह राव यांना हटवण्यासाठी आम्ही पूर्णपणे प्रयत्न केले होते. परंतु त्यावेळी राव यांनी सीताराम केसरींना काँग्रेसचे अध्यक्ष करण्यात आलं. त्यानंतर एच.डी. देवेगौडा पंतप्रधान झाले. १९७८ मध्ये शरद पवार काँग्रेसपासून वेगळी झाली होते. मात्र राजीव गांधी शरद पवार १९८६ मध्ये काँग्रेसमध्ये आले. राजीव गांधींकडे बहुमत होतं. त्यामुळेच शरद पवार काँग्रेसमध्ये परतले. ती भूमिका त्यांनी का घेतली? शरद पवार यांनी १९७८ मध्ये महाराष्ट्राचं भलं होण्यासाठी पुलोदचं सरकार स्थापन केलं होतं. पण सीताराम केसरी यांनी देवेगौडा यांचा पाठिंबा काढून घेतला. १३५ पेक्षा जास्त खासदार शरद पवार यांच्या घरी आले. तुम्ही केसरींना हटवा अशी विनंती सर्वांनी केली. त्यावेळी देवेगौडा यांचा मला फोन आला. मी त्यांच्या घरी गेलो. तेव्हा देवेगौडा यांनी मी राजीनामा देतो, पण केसरींना हटवा. शरद पवार यांना भूमिका घ्यायला सांगा असा मला निरोप दिला", अशी माहिती प्रफुल्ल पटेल यांनी आपल्या दिली.

# मनोज जरांगे पाटील लहान आहेत : नारायण राणे

## » आरक्षण कसं मिळतं, कसं दिलं जातं याचा अभ्यास केला पाहिजे

। हिंगोली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**कुठल्याही राजकीय नेत्याने मराठा आणि ओबीसी अशी झुंज लावून देऊ नये. आमच्या समितीने जेव्हा आरक्षण दिलं होतं तेव्हा कुणाचं आरक्षण काढून द्या असं नाही. मात्र कुणाचंही आरक्षण काढून मराठ्यांना द्यावं या मताचा मी नाही. मनोज जरांगे पाटील यांनी अभ्यास करावा ते अजून लहान आहेत. आरक्षण कसं मिळतं? भारतीय घटनेत काय तरतुदी आहेत त्यांच्याविषयी वाचावं.**



मराठ्यांना विचारावं ते ओबीसी आरक्षण घ्यायला तयार आहेत का? मराठा समाज ओबीसींचं आरक्षण कधीही घेणार नाही असं केंद्रीय मंत्री नारायण राणेंनी म्हटलं आहे. आज पुण्यात त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला त्यावेळी त्यांनी हे वक्तव्य केलं. मराठा आरक्षणावरुन सध्या मनोज जरांगे पाटील आक्रमक झाले आहेत. त्यांच्या महाराष्ट्रातल्या तिसऱ्या टप्प्यातल्या सभाही आता लवकरच सुरु होतील. याबाबत प्रश्न विचारला असता नारायण राणेंनी मनोज जरांगे पाटील लहान आहेत अजून असं म्हटलं आहे. मराठा आरक्षणावर मी काही भविष्यवाणी वर्तवू शकत नाही. कारण मराठ्यांना आरक्षण यावर प्रत्येक नेत्याची मागणी वेगळी आहे. मी मगाशीही स्पष्ट केलं आता पुन्हा सांगतो, कुणाचंही आरक्षण काढून मराठ्यांना आरक्षण न देता ५२ टक्क्यांच्या वर भारतीय घटनेच्या १५/४ प्रमाणे आरक्षण द्यावं. मागास आयोगाकडे पाठवावं, त्याचा सर्व्हे केला जावा. त्यानंतर सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास असलेल्या मराठा समाजाला आरक्षण दिलं जावं हे माझं मत आहे. "उद्धव ठाकरे गट आहे का? गट म्हणावा इतके तरी नेते आहेत का त्यांच्याकडे? तसंच तो नुसता आहेत त्या नेत्यांना शेतकऱ्यांच्या बांधावर जायला सांगेल, पैसे देणार नाही. मातोश्रीमध्ये फक्त वनवे आहे तिथे पैशांची आवक होते, पैसे बाहेर जात नाहीत. मी ३९ वर्षे शिवसेनेत होतो मला सगळं माहीत आहे." असं म्हणत नारायण राणे यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली. प्रकाश आंबेडकर जर दंगलीची माहिती लपवत असतील तर त्यांच्यावर एफआयआर दाखल करुन त्यांना अटक केली पाहिजे. कारण कुठल्या कालावधीत कुठल्या ठिकाणी दंगल होणार हे माहीत असेल तर त्याचा पुरावा द्यावा लागतो. ते म्हणाले असं चालत नसतं. प्रकाश आंबेडकरच नाही तर इतर कुणीही असं वक्तव्य केलं तर त्याची दखल पोलिसांनी घेतली पाहिजे. प्रकाश आंबेडकर यांच्याविषयीच मी बोलतो आहे असं नाही. ज्यांना दंगल होणार याची माहिती आहे आणि ते तसं वक्तव्य करत आहेत त्यांच्याविषयी बोलतो आहे असंही नारायण राणे म्हणाले. मराठा आरक्षणावर मी काही भविष्यवाणी वर्तवू शकत नाही. कारण मराठ्यांना आरक्षण यावर प्रत्येक नेत्याची मागणी वेगळी आहे. मी मगाशीही स्पष्ट केलं आता पुन्हा सांगतो, कुणाचंही आरक्षण काढून मराठ्यांना आरक्षण न देता ५२ टक्क्यांच्या वर भारतीय घटनेच्या १५/४ प्रमाणे आरक्षण द्यावं.

### मी भविष्यवाणी वर्तवू इच्छित नाही

» मराठा आरक्षणावरुन सध्या मनोज जरांगे पाटील आक्रमक झाले आहेत. त्यांच्या महाराष्ट्रातल्या तिसऱ्या टप्प्यातल्या सभाही आता लवकरच सुरु होतील. मराठा आरक्षणावर मी काही भविष्यवाणी वर्तवू शकत नाही. कारण मराठ्यांना आरक्षण यावर प्रत्येक नेत्याची मागणी वेगळी आहे. मी मगाशीही स्पष्ट केलं आता पुन्हा सांगतो, कुणाचंही आरक्षण काढून मराठ्यांना आरक्षण न देता ५२ टक्क्यांच्या वर भारतीय घटनेच्या १५/४ प्रमाणे आरक्षण द्यावं. मागास आयोगाकडे पाठवावं, त्याचा सर्व्हे केला जावा.

# तेलंगणात काँग्रेस बाजी मारणार?

## » राजस्थानची सत्ता काँग्रेसला गमवावी लागण्याची शक्यता

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांच्या रणधुमाळीची सुरू असून 3 डिसेंबरला त्याचा निकाल लागणार आहे. खरंतर ही निवडणूक जरी विधानसभेची असली तरी ही लोकसभेच्या निवडणुकांची रंगीत तालीम असल्याचं समजलं जातंय. या पाच राज्यांच्या निवडणुकांत उडालेला धुरळाच, लोकसभेच्या निवडणुकीत कुणाला विजयाचा गुलाल लावणार आणि कुणाला धूळ चारणार हे ठरवू शकेल.**

या एक्झिट पोलमध्ये अनपेक्षित, आश्चर्यकारक आणि धक्कादायक अशा तिहेरी हिंदोळ्यांवर झुलणारे अंदाज समोर आले आहेत. राजस्थानच्या गळ्यात भाजपच्या कमळाचा हार पडणार असल्याचं चित्र आहे आणि राजस्थान काँग्रेसचा हात सोडणार, असा अंदाज सर्व्हेतून समोर आलाय. तर तिकडे मध्य प्रदेशातलं भाजपचं कमळ यावेळी कोमेजणार असा अंदाज वर्तवण्यात आलाय. तेलंगणात मात्र काँग्रेस कडवी झुंज देत, महाराष्ट्रात शिरकाव करण्याच्या प्रयत्नात असलेल्या, चंद्रशेखर राव यांना चारीमुंड्या चीत करणार, असं सर्वेक्षण सांगतंय. महत्त्वाचं म्हणजे, 2018 साली काँग्रेसचा पकडलेला हात, छत्तीसगड यावेळीही घट्ट पकडून ठेवणार, असा सर्व्हेचा अंदाज आहे. या पाच राज्यांमध्ये तुलनेने लहान राज्य असलेल्या मिझोरामने गेल्यावेळी एमएनएफला चांगली साथ दिली होती, यावेळी मात्र मिझोरामने त्रिशंकू कौल देत, बुचकाळ्यात टाकण्याचा कौल दिल्याचं सर्व्हेतून समोर आला आहे. एबीपी माझा आणि सी-वोटरच्या सर्व्हेचा सार काढायचा झाला तर, पाचपैकी एका राज्यांत भाजप आणि तीन राज्यांत काँग्रेस



विजयाचा झेंडा रोवणार आहे. तर एका राज्यात त्रिशंकू स्थिती असेल असं सर्व्हेक्षणातून समोर आलंय. पाच राज्यांच्या निवडणुकांसाठीचं मतदान पार पडलं आहे. ३ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. तेलंगणात ११९ जागांसाठी मतदान पार पडलं आहे. ६० जागा मिळवणारा पक्ष सत्ता स्थापन करुन शकणार आहे. भाजपा, काँग्रेस आणि BRS अशी तिरंगी लढत या ठिकाणी पार पडली आहे. या लढतीत कुणाचा विजय होणार हे ३ डिसेंबर रोजी स्पष्ट होईलच. मात्र आता एग्झिट पोलचे अंदाज समोर येत आहेत. इंडिया टीव्ही सीएनक्सच्या एग्झिट पोलचा अंदाज सांगतो आहे की बीआरएसला ३१ ते ४७ जागा मिळतील. तर काँग्रेसला ६३ ते ७९ जागा मिळतील. भाजपाला २ ते ४ जागा मिळतील. तर एमआयएमला ५ ते ७ जागा मिळतील असा अंदाज वर्तवला आहे. म्हणजेच काँग्रेसला तेलंगणात स्पष्ट बहुमत मिळणार हा अंदाज या पोलने वर्तवला आहे. बीआरएसला ४० ते ४५ जागा मिळतील असा अंदाज जन की बातने वर्तवला आहे. तर काँग्रेसला ४८ ते ६४ जागा मिळतील असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. भाजपाला ७ ते १३ जागा मिळतील तर एआयएमआयमला ४ ते ७ जागा मिळतील असा अंदाज या पोलने वर्तवला आहे. काँग्रेसला ५८ ते ६८ जागा मिळतील असा अंदाज या पोलने वर्तवला आहे. तर बीआरएसला ४६ ते ५६ जागा मिळतील.

### बीआरएसला 48 ते 58 जागा

» भाजपाला ४ ते ९ जागा मिळतील असा अंदाज वर्तवला आहे. तर एमआयएमला ५ ते ७ जागा मिळतील असा अंदाज आहे. काँग्रेसला ४९ ते ५९ जागा मिळतील, बीआरएसला ४८ ते ५८ जागा मिळतील तर भाजपाला ५ ते १० जागा मिळतील असा अंदाज वर्तवला आहे. तर एमआयएमला ६ ते ८ जागा मिळतील असा अंदाज आहे. इंडिया टीव्ही-सीएनएक्सच्या एक्झिट पोलनुसार, मिझो नॅशनल फ्रंट पार्टी मिझोराममध्ये 14-18 जागा जिंकू शकते. काँग्रेसला 8-10 जागा, झेडपीएमला 12-16 जागा, भाजपला 0-2 जागा मिळू शकतात. या सर्वेक्षणाच्या आकडेवारीनुसार, छत्तीसगडमध्ये भाजपला 41 टक्के मते मिळण्याची शक्यता आहे आणि काँग्रेसला एकूण 43 टक्के मते मिळण्याची शक्यता आहे. जागांच्या बाबतीत, छत्तीसगडमध्ये भाजपला 30-40 जागा, काँग्रेसला 46-56 आणि इतरांना 3-5 जागा मिळण्याचा अंदाज आहे. बीआरएसला ४८ ते ५८ जागा मिळतील तर भाजपाला ५ ते १० जागा मिळतील असा अंदाज वर्तवला आहे.

# सबसिडी देशात मोफत दिली जाऊ नये!

## » मीसुद्धा गरीब : एन. आर. नारायण मूर्ती

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आर्थिक आघाडीवर चांगली कामगिरी करणाऱ्या देशांशी स्पर्धा करण्यासाठी भारताला आपली कार्यसंस्कृती बदलावी लागेल. यासाठी तरुणांनी कामात जास्त वेळ घालवला पाहिजे, असं वक्तव्य इन्फोसिसचे सहसंस्थापक एन. आर. नारायण मूर्ती यांनी केलं होतं. त्यांच्या मते भारतात काम करणाऱ्यांची उत्पादकता जगात सर्वात कमी आहे. ती वाढवण्यासाठी देशातील तरुणांनी दर आठवड्याला ७० तास काम करायला हवं. मूर्ती यांच्या या वक्तव्यानंतर त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात टीकाही झाली. दरम्यान, नारायण मूर्ती यांनी आता असंच आणखी एक वक्तव्य केलं आहे.**



नारायण मूर्ती म्हणाले, "देशात कुठलीच गोष्ट मोफत दिली जाऊ नये". बंगळुरू येथे आयोजित टेक समिट २०२३ मध्ये ते बोलत होते. मूर्ती म्हणाले, मी कोणत्याही मोफत सेवा देण्याच्या विरोधात नाही. परंतु, सरकारकडून दिल्या जाणाऱ्या सेवा आणि सबसिडीचा लाभ घेणाऱ्या लोकांनी समाजाच्या भल्यासाठी योगदान देणं आवश्यक आहे. जेव्हा तुम्ही अशा प्रकारच्या सेवांचा लाभ घेता, सबसिडी मिळवता, तर त्या बदल्यात तुम्ही काहीतरी द्यायला हवं. भारतासारख्या गरीब देशाला समृद्ध करण्यासाठी तळागाळातल्या लोकांना सक्षम करणारी भांडवलशाही हा एकमेव पर्याय आहे. टेक समिटमधील मुलाखतीच्या कार्यक्रमात नारायण मूर्ती यांनी हे वक्तव्य केलं.

झिरोधाचे सह-संस्थापक निखिल कामत यांनी मूर्ती यांची मुलाखत घेतली. नारायण मूर्ती म्हणाले, मी मोफत सेवांच्या विरोधात वगैरे नाही. कारण मीसुद्धा एका गरीब घरातून आलो आहे. परंतु, मला वाटतं आपण त्या लोकांकडून काही अपेक्षा ठेवायला हरकत नाही जे मोफत सेवांचा, सबसिडींचा लाभ घेत आहेत. जेणेकरून ते आपल्या पुढच्या पिढ्यांना, मुलं आणि नातवंडांना शाळेत जाण्यासाठी, यशस्वी होण्यासाठी, सक्षम करण्यासाठी अधिक जबाबदारी घेतील.

यावेळी नारायण मूर्ती यांना प्रश्न विचारण्यात आला की, देशाचा जीडीपी वाढवण्यासाठी सरकारला काय सल्ला द्याल. त्यावर नारायण मूर्ती म्हणाले, आपल्या नेत्यांनी चीनचा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. चीनमध्ये आपल्यासारख्याच समस्या होत्या. परंतु, आता त्यांचा जीडीपी आपल्यापेक्षा पाच ते सहा पट अधिक आहे. म्हणून मी आपल्या राज्यकर्त्यांना सल्ला देईन की, खूप काळजीपूर्वक चीनचा अभ्यास करा. तिकडे कोणकोणत्या चांगल्या गोष्टी आहेत त्या शिकून आपण आपल्या देशात लागू करू शकतो. जेणेकरून भारतही चीनप्रमाणे प्रगती करू शकेल आणि आपल्या देशातली गरिबी कमी होईल.

# मी हिंदीत पाच शब्द बोलायचो : राहुल गांधी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

तेलंगणा विधानसभेसाठी आज ( ३० नोव्हेंबर ) मतदान पार पडत आहे. भारत राष्ट्र समिती ( बीआरएस ) आणि काँग्रेसमध्ये थेट लढत होत आहे. या निवडणुकीसाठी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी तेलंगणात तळ ठोकला होता. अशातच तेलंगणात प्रचारसभेवेळी एक अनुवादक भाषणाचं भाषांतर करताना कसा अडचणीत सापडला होता, याचा किस्सा राहुल गांधींनी सांगितला आहे.


राहुल गांधी म्हणाले, "मी हिंदीत बोलताना पाच शब्द बोलत होतो. मला वाटलं, तेलुगूत किमान पाच-सात शब्दांत अनुवाद होईल. पण, अनुवादक २०, २५ ते ३० शब्द बोलायचा. कधी कधी मी बोरिंग बोलायचो. पण, तेलुगूत तेच ऐकून समोरील नागरिक आनंदी व्हायचे. तर, कधी चांगलं बोललो, तर नागरिक शांत बसायचे." मी स्टेजवर फक्त हसत होतो. कारण, मला काही बोलताच येत नव्हते," अशी मिश्कील टिप्पणीही राहुल गांधींनी केली आहे. केरळमधील कोझिकोड येथे मुस्लीम लीगचे दिवंगत नेते पी. सेठी. हाजी यांच्यावरील पुस्तक प्रकाशन सोहळ्यात राहुल गांधी बोलत होते.

यावेळी खासदार अब्दुसमद समदानी यांनी राहुल गांधींच्या भाषणाचं मल्याळममध्ये अनुवादन केलं. राहुल गांधी म्हणाले, "समदानी हे चांगले अनुवादक आहेत. या सोहळ्यात भाषणाचे भाषांतर करताना कुठलीही समस्या येणार नाही, याची मला खात्री आहे."

राहुल गांधींनी पी. सेठी. हाजी यांचा मुलगा पी. के. बशीर यांचं कौतुक केलं आहे. "हाजी यांच्याबद्दल मला जास्त माहिती नाही. कारण, मी त्यांना कधीही भेटलो नव्हतो. पण, त्यांच्या मुलाकडे पाहून ते कसे असतील, याचा अंदाज लावू शकता."

# बायकोनं केला अपमान!

मुंबईत ट्विंकल खन्नाच्या पुस्तकाचा बुकलॉंच सोहळा झाला. ट्विंकल खन्नाने तिचे दुसरे पुस्तक 'वेलकम टू पॅराडाइज' लॉंच केले. लॉन्चिंगला काही बॉलीवूड स्टार्स उपस्थित होते ज्यांनी तिचे अभिनंदन केले. बुकलॉंचच्या वेळी घडलेल्या एका घटनेने चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले. क्लिपमध्ये अक्षय कुमार आपल्या पत्नीचा ऑटोग्राफ घेण्यासाठी पुढे येताना दिसत आहे. मात्र, ट्विंकलचा असे काही केले की अक्षयचा सर्वांसमोर अपमान झाला. जाणून घ्या काय घडलं. बॉलीवूडचा 'खिलाडी' बायकोच्या बुकलॉंचच्या वेळी उपस्थित होता. अक्षय कुमार काळ्या रंगाच्या कपड्यात देखणा दिसत होता. पुस्तकाच्या लाँचिंगचे अनेक फोटो आणि व्हिडिओ व्हायरल होत असताना. अशातच अक्षयचा एक व्हिडिओ व्हायरल झालाय.एका क्लिपमध्ये अक्षय पुस्तक घेऊन खुर्चीवर बसलेल्या ट्विंकलच्या जवळ जाताना दिसत आहे. तो तिचा ऑटोग्राफ घेण्यासाठी पुस्तक टेबलावर ठेवतो. ज्यावर ट्विंकल उत्तर देते, "तू हे फक्त फोटोसाठी करत आहेस," आणि अक्षय हसतो आणि मागे वळतो. अक्षय जरी हसून मागे वळला असला तरीही त्याचा चेहरा पडलेला दिसतो. या व्हिडिओवर नेटकरी प्रतिक्रिया देत आहेत. अनेकांना ट्विंकल अक्षयसोबत जे वागली ते आवडलं नाहीय. या बुकलॉंचच्या वेळी अक्षय आणि डिंपलची उपस्थिती विशेष ठरली. इव्हेंटमध्ये दोघेही गप्पा मारताना दिसले. जावई आणि सासूने एकमेकांशी मनमुराद गप्पा मारल्या. त्यांच्या जोडीला जॅकी श्रॉफ सुद्धा दिसतात.



# राणी मुखर्जी अन् काजोलमध्ये होता अबोला



'कॉफी विथ करण 8' (KOFFEE WITH KARAN 8) या कार्यक्रमात काजोल (KAJOL) आणि राणी मुखर्जी (RANI MUKERJI) सहभागी झाले होते. काजोल आणि रानी मुखर्जी या बॉलिवूडच्या लोकप्रिय अभिनेत्री असण्यासोबत बहिणीदेखील आहेत. नुकताच करण जोहरच्या (KARAN JOHAR) 'कॉफी विथ करण 8' या कार्यक्रमाचा लेटेस्ट एपिसोड समोर आला आहे. यात काजोल आणि रानी या इंडस्ट्रीतील अभिनेत्री मनोरंजनसृष्टी ते वैयक्तिक आयुष्यासंबंधित अनेक गोष्टींवर भाष्य करताना दिसत आहेत. करण जोहरच्या 'कॉफी विथ करण 8' या कार्यक्रमात काजोल आणि राणी मुखर्जी यांनी त्यांच्यात आलेल्या दुराव्याबद्दल भाष्य केलं आहे. काजोल म्हणाली की,"आम्ही एकमेकींसोबत बोलत नव्हतो, अशी एक वेळ होती. आमच्यात भांडण झालंय असंही काही नव्हतं. पण आपापल्या कामात आम्ही व्यस्त होतो. त्यामुळे आमचा एकमेकींसोबत संवाद होत नव्हता". राणी मुखर्जी म्हणाल्या,"काजोलला मी लहानपणापासून ओळखते. ती माझ्यासाठी काजोल दीदी होती. मोठं होत असताना आमच्यात कसा दुरावा आला हे मला माहिती नाही. आम्ही साधं एकमेकींना भेटलोदेखील नाही. काजोल दीदी शहरात राहायची आणि आम्ही जुहूमध्ये. आमच्या कुटुंबात मी आणि तनीशा एकमेकींच्या चांगल्या मैत्रिणी आहोत. आजही आमची छान मैत्री आहे. पण कुटुंबातील भावांसोबत काजोलचं जास्त पटायचं. हे थोटं विचित्र होतं". काजोल म्हणाली की,"वडिलांच्या निधनानंतर मी आणि राणी एकमेकींसोबत बोलू लागलो". रानी म्हणाली,"कुटुंबातील तुमच्या लाडक्या व्यक्तीला जेव्हा तुम्ही जमावता तेव्हा तुमचं मोठं नुकसान झालेलं असतं. त्यावेळी तुम्ही एकमेकांच्या जास्त जवळ येता. काजोलचे वडील शोमू मुखर्जी आणि माझं खूप घट्ट नातं होतं". काजोल आणि राणी मुखर्जी नुकतेच 'कॉफी विथ करण 8' या कार्यक्रमात सहभागी झाले होते. त्यावेळी त्यांनी त्यांच्या नात्याबद्दल भाष्य केलं. काजोल आणि राणी मुखर्जीचा हा भाग खूपच स्पेशल होता. डिझ्नी प्लस हॉटस्टार या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रेक्षकांना हा भाग पाहता येईल.

# विकी जैनसाठी अंकिता लोखंडे इन्वेस्टमेंट

'बिग बॉस 17' हा छोट्या पडद्यावरील लोकप्रिय वादग्रस्त कार्यक्रम आहे. गेल्या काही दिवसांपासून हा कार्यक्रम प्रेक्षकांचं चांगलच मनोरंजन करत आहे. या कार्यक्रमात अंकिता लोखंडे (ANKITA LOKHANDE) आणि विकी जैन (VICKY JAIN) सहभागी झाल्याने चाहत्यांना आनंद झाला होता. पण अंकिता आणि विकीच्या सततच्या भांडणामुळे प्रेक्षकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. 'बिग बॉस 17'च्या घरात सतत अंकिता आणि विकीचं भांडण पाहायला मिळत आहे. दररोज वेगवेगळ्या विषयांवर ते भांडत आहेत. 'बिग बॉस 17'मध्ये अंकिता आणि विकीचे रोमँटिक मोमेंट्स पाहायला मिळतील असं चाहत्यांना वाटलं होतं. पण प्रत्यक्षात मात्र चित्र वेगळचं आहे. दरम्यान मन्नारा चोप्रा आणि सना रईस खान यांना ईशा मालवीयने विकीने अंकितासोबत लग्न का केलं हे सांगितलं आहे.

# उर्फीने लावली आग

अभिनेत्री उर्फी जावेद (URFI JAVED) आपल्या सिनेमांपेक्षा हटके फॅशन स्टाईलमुळे अनेकदा चर्चेत असते. सोशल मीडियावर उर्फी ट्रोल होणं हे काही नवं नाही. विचित्र फॅशन आणि बोल्ड वक्तव्यामुळे उर्फी नेहमीच चर्चेच्या केंद्रस्थानी असते. तिचा प्रत्येक खूप खूप खास असतो. उर्फीच्या लेटेस्ट टॉपलेस फोटोने (URFI JAVED LATEST PHOTO) सोशल मीडियावर आग लावली आहे. अल्पावधीतच हा फोटो व्हायरल झाला आहे. उर्फी जावेदच्या लेटेस्ट फोटोने नेटकऱ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. हा फोटो सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. या फोटोमध्ये उर्फीने कोणताही टॉप घातलेला दिसत नाही. एका बाथटबमध्ये ती उभी असलेली दिसत आहे. अभिनेत्रीने फक्त जीन्स परिधान केली आहे. उर्फीचा हा अवतार सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरतो आहे. उर्फी जावेद नेहमीच तिच्या कपड्यांमुळे आणि चित्रविचित्र फॅशन सेन्समुळे चर्चेत येत असते. आता टॉप न घातलेल्या तिच्या फोटोवर नेटकऱ्यांनी कमेंट्सचा वर्षाव केला आहे. जन्माला आली तशीच आजही फिरते, उर्फीला तिचे आई-वडील काही बोलत नाहीत का?, उर्फी खूपच सुंदर आणि हॉट दिसत आहे, मला उर्फी खूप आवडते, पलट, अशा कमेंट्स नेटकऱ्यांनी केल्या आहेत. उर्फी जावेद सोशल मीडियावर चांगलीच ॲक्टिव्ह आहे. दररोज न चुकता चाहत्यांसोबत ती बोल्ड व्हिडिओ आणि फोटो शेअर करत असते. उर्फीचे चाहतेदेखील तिच्या वेगवेगळ्या लूक्सची प्रतीक्षा करत असतात.



# 'बिग बॉस मराठी'चा विजेता अक्षय केळकरला लागलं म्हाडाचं घर

मुंबईसारख्या शहरात स्वत:चं घर होणं हे अनेकांचं स्वप्न असतं. सर्वसामान्यांपासून ते सेलिब्रिटी मंडळींपर्यंत सर्वच जण स्वत:चं घर होण्यासाठी खूप मेहनत घेत असतात. 'बिग बॉस मराठी'च्या चौथ्या पर्वाचा विजेता (BIGG BOSS MARATHI 4 WINNER) अक्षय केळकरसाठी (AKSHAY KELKAR) हे वर्ष खूपच खास आहे. एकीकडे वर्षाच्या सुरुवातीला तो 'बिग बॉस मराठी 4'चा विजेता झाला. तर दुसरीकडे वर्षाच्या शेवटी मुंबईत त्याला म्हाडाचं घर लागलं आहे. स्वत:चं घर झाल्याबद्दल एबीपी माझाशी बोलताना अक्षय केळकर म्हणाला,"मुंबईकर झालो आहे, याचा नक्कीच आनंद आहे. आठवर्षापूर्वी कामाने मुंबईकर झालो होतो. पण मनाने मात्र मी कायम ठाणेकरच असणार आहे. मुंबई कर्मभूमी असली तरी ठाणे हे कायम माझ्या जवळचं राहणार आहे. मुंबईत



घर होणं हे प्रत्येकाचं स्वप्न असतं. माझंही ते होतं. माझं पहिलं घर मुंबईत झाल्याचा नक्कीच आनंद आहे. ठाणे सुटलेलं नाही. मला घर लागलेल्या ठिकाणाचं नाव मागा ठाणे आहे". अक्षय पुढे म्हणाला,"2023 हे वर्ष माझ्यासाठी कमाल आहे. 2023 च्या सुरुवातीला मी 'बिग बॉस'चा विजेता झालो. वर्षाच्या शेवटी मला म्हाडाचं घर लागलं. एकंदरीत 2023 ची सुरुवात आणि शेवट गोड झाली आहे. 2023 नंतरची सर्व वर्ष माझीच असतील, असं मला वाटतं. सिनेमात, मालिकेत दिसणारी चमचमणारी मुंबई आता घरबसल्या पाहता येणार आहे". अक्षयने घर लागल्यानंतर एक खास पोस्ट शेअर केली आहे. त्याने लिहिलं आहे,"माझं पहिलं घर - ते ही मुंबईत... 2023 मध्ये सगळ्या सुंदर गोष्टी आयुष्यात घडल्या, त्यातली खूप सुंदर आणि अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, मुंबईत माझं स्वतःच "घर". काही वर्षांपूर्वी जेव्हा या क्षेत्रात काम करायला सुरुवात केली, तेव्हा माझ्या पाच मित्रांसोबत, म्हाडाच्या बिल्डिंगमध्ये रूम शेअर करून भाड्याने राहत होतो. त्याच म्हाडाच्या मुंबईच्या प्रकल्पामध्ये या वर्षी अर्ज केला होता आणि सोडतीमध्ये विजेता ठरलो".

# आफ्रिका दौऱ्यासाठी टीम इंडियाची घोषणा

## द. आफ्रिका दौऱ्यातही विराट कोहली, रोहित शर्माला विश्रांती

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**आगामी दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. गुरुवारी बीसीसीआयचे वरिष्ठ अधिकारी, मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड आणि मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांनी भेट घेऊन संघाला अंतिम रूप दिले. भारतीय संघाचा दक्षिण आफ्रिका दौरा १० डिसेंबरपासून सुरू होत आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने तीन टी-२०, तीन एकदिवसीय आणि दोन कसोटी सामन्यांसाठी टीम इंडियाची घोषणा केली आहे. या दौऱ्याची सुरुवात १० डिसेंबर रोजी तीन सामन्यांच्या टी-२० सामन्याने होईल.**



सर्व चर्चा आणि शक्यतांना पूर्णविराम देत बीसीसीआयने दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर टी-२० मालिकेत सूर्यकुमार यादव टीम इंडियाचे नेतृत्व करणार असल्याचे जाहीर केले आहे. तर के.एल. राहुलकडे वन डेचे कर्णधारपद सोपवण्यात आले आहे. म्हणजेच राहुल एकदिवसीय क्रिकेटचा नवा कर्णधार आणि पुढील विश्वचषकासाठी बीसीसीआयच्या योजनेचा एक भाग असू शकतो. ३५ वर्षीय अजिंक्य रहाणेला कसोटी संघातून वगळण्यात आले आहे. वेस्ट इंडिज दौऱ्यात तो विशेष काही करू शकला नाही. दोन कसोटी सामन्यांच्या दोन डावात त्याला केवळ ११ धावा करता आल्या. मात्र, त्याआधी जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या अंतिम सामन्यात त्याने ८९ आणि ४६ धावांची इनिंग खेळली होती. या फायनलमधूनच रहाणेचे कसोटी संघात पुनरागमन झाले. त्यापूर्वी त्याला श्रीलंका आणि ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेत संधी मिळाली नव्हती. दुसरीकडे, चेतेश्वर पुजारालाही कसोटी संघात स्थान मिळालेले नाही. पुजारा शेवटचा वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचा अंतिम सामना या वर्षी जूनमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळला होता. त्यात त्याने दोन डावात १४ आणि २७ धावांची खेळी केली होती. तेव्हापासून तो कसोटी संघातून बाहेर आहे. के.एल. राहुल, श्रेयस अय्यर आणि जसप्रीत बुमराह यांचे कसोटी संघात पुनरागमन झाले आहे. श्रेयसने या वर्षी मार्चमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध शेवटची कसोटी खेळली होती. त्याचवेळी राहुलने या वर्षी फेब्रुवारीमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध शेवटची कसोटी खेळली होती. बुमराहचे तब्बल दीड वर्षानंतर कसोटी संघात पुनरागमन झाले आहे. जुलै २०२२ मध्ये त्याने अखेरची कसोटी इंग्लंडविरुद्ध खेळली होती. त्याचबरोबर बुमराहचीही उपकर्णधारपदी निवड करण्यात आली आहे. भारताचा दक्षिण आफ्रिका दौरा १० डिसेंबरपासून सुरू होत आहे. या काळात दोन्ही संघ तीन टी-२०, तीन एकदिवसीय आणि दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळणार आहेत. भारतीय संघ ६ डिसेंबरला दक्षिण आफ्रिकेला रवाना होणार आहे. टी-२० मालिका १० डिसेंबरपासून, एकदिवसीय मालिका १७ डिसेंबरपासून आणि कसोटी मालिका २६ डिसेंबरपासून सुरू होणार आहे.

### भारताचा कसोटी संघ

रोहित शर्मा (कर्णधार), शुबमन गिल, यशस्वी जैस्वाल, विराट कोहली, श्रेयस अय्यर, ऋतुराज गायकवाड, इशान किशन (यष्टीरक्षक), के.एल. राहुल (यष्टीरक्षक), रविचंद्रन अश्विन, रवींद्र जडेजा, शार्दुल ठाकूर, मोहम्मद सिराज, मुकेश कुमार, मोहम्मद शमी, जसप्रीत बुमराह (उपकर्णधार), प्रसिध कृष्णा.

### वनडे संघात अनेक मोठे बदल

वनडे संघात अनेक मोठे बदल करण्यात आले आहेत. के.एल. राहुलकडे कर्णधारपद सोपवण्यात आले आहे, तर कुणालाही उपकर्णधारपद देण्यात आलेले नाही. गुजरात टायटन्सकडून खेळणारा डावखुरा फलंदाज साई सुदर्शन याने संघात प्रवेश केला आहे. त्याचबरोबर रिंकू सिंगला टी-२० नंतर वन डे संघातही स्थान मिळाले आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून खेळणाऱ्या रजत पाटीदारलाही संघात स्थान दिले आहे. याआधीही तो टीम इंडियामध्ये सामील झाला आहे, मात्र त्याला पदार्पणाची संधी मिळाली नाही. संजू सॅमसन आणि युजवेंद्र चहलचेही वन डे संघात पुनरागमन झाले आहे.

---

# वेगवान गोलंदाज टीम साऊदीने केला नवा विक्रम

## कसोटीमध्ये न्यूझीलंडकडून अशी कामगिरी करणारा तिसरा खेळाडू

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**बांगलादेश विरुद्ध न्यूझीलंड यांच्यात सिल्हेट येथे सुरू असलेल्या कसोटी मालिकेत फलंदाजी करताना वेगवान गोलंदाज टीम साऊदीने आपल्या नावावर एक खास विक्रम नोंदवला आहे. न्यूझीलंडचा कर्णधार साऊदीने पहिल्या कसोटी सामन्यात २००० धावा पूर्ण केल्या आहेत. त्यानंतर तो एका खास खेळाडूंच्या यादीत सामील झाला आहे.**



पहिल्या कसोटीत फलंदाजी करताना साऊदीने ६५ चेंडूत ३५ धावांची खेळी खेळली, ज्यात त्याने ३ चौकारही मारले. ही खेळी खेळताना त्याने त्याच्या २००० कसोटी धावा पूर्ण केल्या आहेत. साऊदीने आतापर्यंत एकूण ९५ कसोटी सामने खेळले आहेत, ज्यामध्ये त्याने १३५ डावांमध्ये ६ अर्धशतकांसह २०११ धावा केल्या आहेत. या कालावधीत त्याची सरासरी १६.२१ इतकी आहे. या डावात टीम साऊदीची सर्वोत्तम धावसंख्या ७७* नाबाद आहे. याशिवाय त्याने आतापर्यंत कसोटीत ३०० विकेट्स घेतल्या आहेत.

कसोटी क्रिकेटमध्ये २००० धावा पूर्ण करणारा कर्णधार टीम साऊदी हा न्यूझीलंडचा तिसरा गोलंदाज ठरला आहे. त्याच्या आधी न्यूझीलंडचे दिग्गज रिचर्ड हॅडली आणि डॅनियल व्हिटोरी यांच्या नावावर हा विक्रम होता. हॅडलीने ८६ कसोटी सामन्यात ४३१ विकेट्स घेतल्या आहेत. त्याने किवी संघासाठी २७.१६च्या सरासरीने ३,१२४ धावा केल्या आहेत. या खेळीत त्याच्या २ शतके आणि १५ अर्धशतकांचा समावेश आहे. याशिवाय डॅनियल व्हिटोरीने ११३ कसोटी सामन्यात ३६२ विकेट्स घेत ३०.००च्या सरासरीने ४५३१ धावा केल्या आहेत. त्याने किवी संघासाठी सहा शतके आणि २३ अर्धशतके झळकावली आहेत. जर या सामन्याबद्दल बोलायचे झाले तर न्यूझीलंडने पहिल्या डावात ३१७ धावा केल्या होत्या. ज्यामध्ये केन विल्यमसनने आपले २९वे शतक झळकावले. त्याने २०५ चेंडूत ११ चौकारांच्या मदतीने १०४ धावांची खेळी केली. ग्लेन फिलिप्सने पहिल्या डावात न्यूझीलंडसाठी जबरदस्त गोलंदाजी केली. त्याने १६ षटकात ५३ धावा देत ४ विकेट्स घेतल्या. पहिल्या कसोटीत फलंदाजी करताना साऊदीने ६५ चेंडूत ३५ धावांची खेळी खेळली, ज्यात त्याने ३ चौकारही मारले. ही खेळी खेळताना त्याने त्याच्या २००० कसोटी धावा पूर्ण केल्या आहेत. साऊदीने आतापर्यंत एकूण ९५ कसोटी सामने खेळले आहेत, ज्यामध्ये त्याने १३५ डावांमध्ये ६ अर्धशतकांसह २०११ धावा केल्या आहेत. या कालावधीत त्याची सरासरी १६.२१ इतकी आहे. या डावात टीम साऊदीची सर्वोत्तम धावसंख्या ७७* नाबाद आहे. याशिवाय त्याने आतापर्यंत कसोटीत ३०० विकेट्स घेतल्या आहेत.

### साऊदीच्या कसोटीत 300 विकेट्स

डॅनियल व्हिटोरीने ११३ कसोटी सामन्यात ३६२ विकेट्स घेत ३०.००च्या सरासरीने ४५३१ धावा केल्या आहेत. त्याने किवी संघासाठी सहा शतके आणि २३ अर्धशतके झळकावली आहेत. जर या सामन्याबद्दल बोलायचे झाले तर न्यूझीलंडने पहिल्या डावात ३१७ धावा केल्या होत्या. ज्यामध्ये केन विल्यमसनने आपले २९वे शतक झळकावले. त्याने २०५ चेंडूत ११ चौकारांच्या मदतीने १०४ धावांची खेळी केली. ग्लेन फिलिप्सने पहिल्या डावात न्यूझीलंडसाठी जबरदस्त गोलंदाजी केली. त्याने १६ षटकात ५३ धावा देत ४ विकेट्स घेतल्या. पहिल्या कसोटीत फलंदाजी करताना साऊदीने ६५ चेंडूत ३५ धावांची खेळी खेळली, ज्यात त्याने ३ चौकारही मारले.

# MahaENews

The fight for truth... the right to democracy!

www.mahaenews.com | FRIDAY, 1st DECEMBER 2023 | Digital Edition | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


# Steadfast to the advancement of Shree Ganesh Cooperative Bank!

## Newly elected chairman of the bank, Shankar Jagtap speaks out his sentiments; Elected unopposed for the post of Chairman by the Board of Directors

**Pimpri : Representative**



**Ever since the inception of Shree Ganesh Sahakari Bank, this bank has been significant to the people at grass root level. Pledged and bound to public service, this bank was established by people's leader Laxmanbhau Jagtap. Laxmanbhau always insisted on providing swift service to the customers. Shankar Jagtap, the newly elected chairman of Shree Ganesh Sahakari Bank expressed the feeling that through this inspiration, he and his team are determined to take the bank forward.**



> Shree Ganesh Co-operative Bank is progressing on the path of development shown by people's leader Laxmanbhau Jagtap through the perception of co-operation. We are committed to maintain the trust and steady progress of the Bank as the members and account holders have shown in the Bank. The trust shown in the bank by the account holders is the acknowledgment of our work.
>
> **- Shankar Jagtap,**
> Chairman, Shree Ganesh Sahakari Bank Ltd., Pimple Gurav.

A meeting of the elected directors was held today (30th Nov) at the central office of Shree Ganesh Bank at Pimple Gurav. Shankar Jagtap was unanimously elected as the president, while Santosh Devkar was elected as the vice president during the same. Shankar Jagtap was speaking after this election. In future, cooperative sector will play an important role in the development of the country. Hence Laxmanbhau Jagtap, Nanasaheb Shitole, Rajendra Rajapure, Dattatray alias Raosaheb Chaugule and Uddhav Patel took initiative and established the bank in the year 1998. People's trust in Laxmanbhau and the bank's prompt service, attractive loan schemes, deposit schemes keep the footfall of customers continuously increasing. Quinquennial election (year 2023-2028) of the bank was held few days ago. 17 directors were elected unopposed during the same. The President and Vice President have been elected from and by the Board of Directors. Nagnath Kenjeri, assistant Shashikant Shingare, Gajendra Savaikar worked as election officers in this election. Bank's Chief Executive Officer Sanjay Bait, Branch Manager Ishwar Kate and other employees were present at the occasion. People's leader Laxmanbhau Jagtap started the practice of unopposed election of the bank. However, even after sad demise of MLA Jagtap, his brother Shankar Jagtap also won this five-yearly election unopposed and maintained the legacy.

### THE NEWLY ELECTED EXECUTIVE PANEL IS AS FOLLOWS...

**» President : Shankar Pandurang Jagtap, Vice President : Santosh Sakharam Deokar, Executive Members : Rajendra Shankar Rajapure, Dattatray Govind Chowgule, Shashikant Ganpat Kadam, Sanjay Ganpat Jagtap, Uddhav Murar Patel, Suresh Shankar Taware, Shivling Baswant Kinge, Ankush Ramchandra Khabikar, Madhukar Sopan Ranpise. , Suresh Tatyaba Shinde, Shahaji Bhagwan Patil, Pramod Nana Thakar, Abhay Keshav Nardvekar. Directors : Rajshree Bibhishan Jadhav, Shaila Janardhan Jagtap.**

# Pune: Pimpri-Chinchwad Traffic Police To Launch Massive Vehicle Inspection Drive From December 1

## aims to prevent and trace incidents related to unauthorized vehicles

**Chinchwad :**



**In a proactive move to address vehicle theft and the use of fake number plates in Pimpri-Chinchwad City, the Pimpri-Chinchwad traffic branch has initiated a comprehensive vehicle inspection program. The initiative, implemented through the blockade app under the e-challan system, aims to prevent and trace incidents related to unauthorized vehicles.**

Given the significant influx of citizens from abroad and various districts of Maharashtra seeking employment in Pimpri-Chinchwad, the city has experienced a surge in the use of vehicles, particularly two-wheelers. Recognizing the need for heightened vigilance, the traffic branch has formed 20 teams to conduct vehicle inspections across various locations in the city. These teams, comprising two police officers each, are strategically deployed in 14 traffic divisions and six teams from the Pimpri-Chinchwad traffic control room. Their focus areas include railway stations, bus stands, shopping malls, schools, under flyover parking, society parking, and areas with abandoned vehicles. The teams aim to detect and prevent incidents related to vehicle theft and the use of fake number plates.

This proactive approach aligns with the vision of Commissioner of Police Vinaykumar Choubey, Joint Commissioner of Police Sanjay Shinde, Additional Commissioner of Police Vasant Pardeshi, and Deputy Commissioner of Police, Traffic Branch, Bapu Bangar.